"आधार" क्रमांक नोंदणीकरिता
पडताळणी कर्त्याची नियुक्ती करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य् प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : मातंस/१२११/प्र.क्र.३/३९
मंत्रालय, मुंबई – ४०००३२.
दिनांक : २३/१२/२०११

**वाचा :** १) शासन निर्णय, सामान्य् प्रशासन विभाग क्र. मातंस २०१०/प्र.क्र. ७१/ दि. ०९/०९/२०१०

२) शासन निर्णय, सामान्य् प्रशासन विभाग क्र. मातंस २०१०/प्र.क्र. ४८/ दि. २८/०१/२०११

३) शासन निर्णय, सामान्य् प्रशासन विभाग क्र. मातंस २०१०/प्र.क्र. १०९/ दि. २४/०२/२०११

४) शासन निर्णय, सामान्य् प्रशासन विभाग क्र. मातंस २०१०/प्र.क्र. ३ / ३९ दि. ०५/०३/२०११

५) केंद्रशासन, युआयडी एआय चे पत्र क्र (फ) ४ (४)/५७/ २८/२०१०-आर ओबी दि. २० डिसेंबर २०११

**परिपत्रक**

"आधार" क्रमांकासाठी रहिवाशांच्या ओळख पटविणे आणि त्या अनुषंगाने सादर करावयाच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांची पडताळणी कर्ता म्हणुन नियुक्ती करण्याचा निर्णय क्र. १ ०९/०९/२०१० च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. सदर कर्मचारी संपूर्ण् नोंदणी केंद्रावर उपस्थित राहू शकत नाहीत. परिणाम स्वरुप नोंदणीचे काम अपेक्षित गतीने होत नसल्याचे निदर्शनाला आले म्हणुन क्रमांक ४ वरील दि. ०५/०३/२०११ च्या शासन निर्णयान्वये कागदपत्र पडताळणीचे काम नोंदणी केंद्राच्या पर्यवेक्षकाकडे सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु, नोंदणी केंद्राच्या पर्यवेक्षकांकडून कागदपत्र पडताळणीच्या कामात अनेक गंभीर स्वरुपाच्या चुका होत असल्याचे आढळून आलेले आहे. तसेच दि. २० डिसेंबर २०११ यु.आय.डी.ए.आय. च्या नवी दिल्ली यांच्या संदर्भाधिन कार्यालयीन आदेशान्वये नोंदणी केंद्राच्या पर्यवक्षमार्फत कागदपत्राची पडताळणी न करता शासकीय कर्मचारी/निवृत्त शासकीय कर्मचारी

यांच्या मार्फत करावी असे आदेश निर्गमीत केले आहेत. सदरील चुका टाळून आधार क्रमांकाचे नोंदणीतील दोष दूर करण्याकरिता आता खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) आधार क्रमांकाच्या नोंदणीसाठी सादर केलेल्या कागदपत्रांच्या पडताळणीचे काम यापुढे नोंदणी केंद्राच्या पर्यवेक्षकांकडून करण्यात येऊ नये.

२) आधार क्रमांकाच्या नोंदणीसाठी सादर केलेल्या कागदपत्राच्या पडताळणीसाठी निबंधकानी (जिल्हाधिकारी /महानगर पालिका आयुक्त ) आपल्या नियंत्रणातील कर्मचाऱ्यांची पडताळणीकर्ता म्हणून नियुक्ती करावी. पडताळणी कामकाजाकरिता कर्मचारी अपुरे पडत असतील तर निवृत्त कर्मचाऱ्यांची या कामाकरिता नियुक्ती करावी.

३) कागदपत्रांच्या पडताळणीकरिता दि. ०५/०३/२०११ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचा उपयोग करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक क्रमांक 20111223100709129001 असा आहे.

( डॉ. संतोष भोगले)
अवर सचिव (माहिती व तंत्रज्ञान )

**प्रति,**

१) सर्व विभागीय आयुक्त

२) सर्व जिल्हाधिकारी/महानगर पालिका आयुक्त

३) सर्व नोंदणी संस्था

## महाराष्ट्र शासन

क्रमांक : मातंसं २०१३/ प्र.क्र.५२/३९
माहिती तंत्रज्ञान संचालनालय,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २२फेब्रुवारी, २०१३

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगर पालिका आयुक्त

विषय : जिल्हाधिकारी यांना महानगरपालिका क्षेत्रासाठी आधारचे निबंधक घोषित करणे.

महोदय / महोदया,

आधार प्रकल्पाकरिता महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना आपापल्या कार्यक्षेत्राकरिता राज्यशासनाने निबंधक म्हणून घोषित केलेले आहे. तथापि, लाभार्थ्यांना त्यांचे लाभ थेट देण्यासाठी आधार क्रमांकाशी संलग्न करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. थेट लाभ देण्याच्या योजना फक्त जिल्हाधिकाऱ्यांकडून राबवण्यात येत असल्याचे दिसून आलेले आहे. लाभार्थ्यांचे प्राथम्याने नोंदणी करणे आणि आधार नोंदणीच्या वेळापत्रकामध्ये ताळमेळ असणे थेट लाभ देण्याचे उद्दीष्ट गाठण्यासाठी गरजेचे आहे.

वरील बाबींचा विचार करुन थेट लाभ देण्याच्या योजनेची योग्य प्रकारे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांना याद्वारे त्यांच्या संपूर्ण जिल्ह्याकरिता त्या जिल्ह्यातील महानगरपालिका क्षेत्रासह आधार प्रकल्पाचे निबंधक म्हणून घोषित करण्यात येत आहे.

हे पत्र मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

आपला,

(डॉ. संतोष भोगले)
राज्य समन्वय अधिकारी,
आधार प्रकल्प

प्रत माहितीसाठी :

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
२. सचिव (मातं), महाराष्ट्र शासन
३. डॉ. ए.बी. पांडे, डी.डी.जी., यु.आय.डी.ए.आय., विभागीय कार्यालय
४. [illegible]